# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीसी/२०२०–२१/०४
दिनांक – २३ फेब्रुवारी, २०२१

**परिपत्रक**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित विधी महाविद्यालयाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत मुंबई विद्यापीठाच्या परिपत्रकाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत अनेक तक्रार प्राप्त झालेल्या आहेत.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकेत्तर शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क देण्याच्या योजने अंतर्गत आकारावयाच्या शुल्काबाबत विद्यापीठ परिपत्रक क्र.वि.क./आयसीसी/२०१८–१९/१५, दिनांक ०६ ऑगस्ट, २०१८ मध्ये सविस्तर माहिती दिलेली आहे. (प्रत संलग्न)

तरी संबंधित सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, सर्व विद्याशाखेच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमांना उपरोक्त परिपत्रकानुसारच मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडुन शुल्क आकारण्यात यावे. अन्य कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये, अन्यथा अशा महाविद्यालयाविरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

वरिल परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदर परिपत्रक विद्याप्रीठाच्या संकेतस्थळावर (www.mu.ac.in) उपलब्ध आहे.

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :–

१. प्राचार्य, सर्व संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये (अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्याक महाविद्यालय)

प्रत माहितीसाठी

१. वित्त व लेखा अधिकारी.
२. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव / सह कुलसचिव
३. संचालक, परिक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, कलिना, सांताक्रुझ, मुंबई .४०००९८
४. अभिलेखा विभाग (१०प्रति).
५. अध्यक्ष, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ, फोर्ट, मुंबई .४०००३२.
६. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी, संघटना, विद्यानगरी, सांताक्रुझ, मुंबई .४०००९८.
७. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघ, विद्यापीठ विद्यार्थी भवन, बी रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२०.
८. अध्यक्ष, महाराष्ट्र अंडर प्रिव्हिलेज्ड टिचर्स असोसिएशन, अ–१/२४ अनुपम नगी, मुरबाड रोड कल्याण, जिल्हा ठाणे.
९. सचिव, बॉम्बे युनिर्व्हसिटी अकॅडमिक स्टाफ असोसिएशन, विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व) मुंबई ४०००९८.

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीसी/२०१८–१९/95
दिनांक ०६ ऑगस्ट, २०१८

परिपत्रक

विषय :– मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती योजना व शिक्षणशुल्क, परिक्षा शुल्क देण्याच्या योजनेअंतर्गत आकारावयाचे शुल्क

संदर्भ :– १) विद्यापीठ परिपत्रक क्र.CONCOL/FEE/194of 2008, दि.२३ मे, २००८.
२) विद्यापीठ परिपत्रक क्र.CONCOL/FEE/292 of 2008, दि.७ जूलै,२००८.
३) विद्यापीठ परिपत्रक क्र.वि.क/भा.स.शि(२४)२९६/२००८ दि.७ जूलै,२००८.
४)विद्यापीठपरिपत्रक क्र.वि.क/भा.स.शि(२४)२३२/२००९ दि. १८ जून,२००९.
५) विद्यापीठ परिपत्रक क्र.वि.क/भा.स.शि/पदवी/५३/२०१३दि. ३० मे, २०१२.
६) विद्यापीठ परिपत्रक क्र.वि.क/भा.स.शि पदवी/२/२०१३ दि. ७ जून,२०१३.
७)शासन निर्णय क्र.इबीसी–२०१७/प्र. क्र.७३/ शिक्षण दि.१५ डिसेंबर,२०१७.
८)शासन निर्णय क्र. इबीसी–२०१७/प्र.क्र.४०३/ शिक्षण १ दि. ७ ऑगस्ट,२०१७.
९) शासन निर्णय क्र.विभशा –२०१८/ प्र. क्र.१३५/ शिक्षण १९ जून,२०१८.

प्राचार्य / संचालक, सर्व अनुदानित/ विना अनुदानित कला, वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालये/ संस्था तसेच संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाने निर्गमीत केलेल्या संदर्भाधीन परिपत्रकानुसार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विविध पदवीपुर्व अभ्यासक्रमांसाठी सुधारित शुल्क रचना २००८–२००९ या शैक्षणिक वर्षापासुन लागू करण्यात आली होती व त्यानुसार विद्यापीठाने वेळावेळी परिपत्रके निर्गमित केली आहेत.

या परिपत्रकानुसार सर्व संबधिताना पुन्हा कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठाने परिपत्रक क्र. CONCOL/FEE/194of 2008, दिनांक २३ मे, २००८ अन्वये निश्चित केलेली शुल्क रचना परिपत्रक क्र.CONCOL/FEE/292 of 2008, दिनांक ७ जूलै,२००८, नुसार बदलण्यात आली. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत महाविद्यालयास शिक्षणशुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्क महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागामार्फत विद्यापीठाने निश्चित केलेल्या शुल्काची प्रतिपुर्ती महाविद्यालयांना केली जाते. सदर शुल्क वगळून मागासवर्गीय विद्यार्थ्याकडून पदवीपुर्व अभ्यासक्रमात प्रवेश घेते वेळी खालील शुल्का व्यतिरिक्त कोणतेही शुल्क आकारू नये:– <u>१)ॲडमिशन प्रोसेसिंग फी २) डॉक्युमेंन्ट व्हेरीफीकेशन फी (लागू असल्सास) ३) आय कार्ड शुल्क ४) डिझास्टर रिलिफ फंड ५) ग्रुप इन्शूरंन्स फी ६) स्टुडंट वेलफेअर फंड ७) ई सुविधा ८) अल्यूमनी असोसिएशन फी व ९) व्हाईस चान्सलर फंड</u>

ज्या शुल्काची प्रतीपूर्ती शासनातर्फे करण्यात येते ते शुल्क आकारण्यात येवू नये. असे वरिल सदंर्भाकित क्रमांक २ व ६ च्या परिपत्रकात स्पष्ट केले आहे. विद्यापीठ परिपत्रक क्र.वि.क/भा.स.शि पदवी/२/२०१३ दि. ७ जून,२०१३ निर्गमीत केलेले आहे.

संदर्भ क्रमांक ७ मधिल शासननिर्णयातील तरतुदीनुसार विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गाच्या कोणत्याही विद्यार्थ्याकडून महाविद्यालयांनी त्यांना शासनाकडून अनुज्ञेय असलेल्या शुल्काची मागणी करण्यात येवु नये, अन्यथा अशा महाविद्यालयाविरूध्द कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल. असे स्पष्ट करण्यात आले आहे. ( प्रत संलग्न)

याबाबत असेही कळविण्यात येते की, संदर्भ क्रमांक ८ नुसार संबधित विद्यापीठ / शैक्षणिक संस्था / महाविद्यालये/ तंत्रनिकेतने यांनी कोणत्याही अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्याकडुन शैक्षणिक

प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम घेऊ नये. तसेच कोणत्याही अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक होणार नाही, याची योग्य ती दक्षता घेण्याची जबाबदारी संबधित शैक्षणिक संस्थेची असेल. सदर सूचनांचे उल्लघंन झाल्याचे आढळून आल्यास संबधितांविरूध्द नियमानुसार प्रशासकीय व शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल. अशा सुचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत.(प्रत संलग्न)

संदर्भ क्रमांक ९ मधिल शासननिर्णयानुसार विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणा–या शिक्षण फी, परिक्षा फी व निर्वाह भत्ता, शैक्षणिक पाठयक्रम / कोर्सेस व इतर बाबत तक्रार निवारण करण्यासाठी करावयाच्या अपील/पुनर्विलोकन अशी अर्धन्यायिक स्वरूपाची व्यवस्था निर्माण करण्यात आलेली आहे .(प्रत संलग्न)

वरील सर्व शासन निर्णयांची व परिपत्रकांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव(प्र)

दिनांक: ०६ ऑगस्ट, २०१८
स्थळ : मुंबई ४०००० ३२

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी

१. संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाचे विविध विभाग व संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था
२. प्राचार्य / संचालक, अशासकीय (अनुदानित व विना अनुदानित) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये(अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्याक महाविद्यालय)

प्रत माहितीसाठी

१. सर्व अधिष्ठाते, संचालक, परिक्षा व मुल्यमापन, महात्मा फुले भवन, विद्यानगरी.
२. वित्त व लेखा अधिकारी.
३. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव / सहा. कुलसचिव
४. अध्यक्ष सचिव, मुंबई युनिवर्सीटी वेल्फेअर असोसिएशन (मुनोवा ) फोर्ट, मुंबई .४०००० ३२
५. अध्यक्ष, मुंबई विद्यापीठ कमचारी संघ, फोर्ट, मुंबई .४०००० ३२.
६. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी, संघटना , विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व) मुंबई . ४०००० ९८.
७. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघ, विद्यापीठ विद्यार्थी भवन, बी रोड, चर्चगेट, मुंबई ४०००० २०.
८. अध्यक्ष, महाराष्ट्र अंडर प्रिव्हिलेज्ड टिचर्स असोसिएशन, अ–१/२४ अनुपम नगी, मुरबाड रोड जिल्हा ठाणे.
९. सचिव, मुंबई युनिव्हसिटी अकॅडमिक स्टाफ असोसिएशन, (उमासा) विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व) मुंबई .४०००० ९८.
१०. अभिलेखा विभाग ( १०प्रति).

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव(प्र)